अनुसूचीत जाती उपयोजने अंतर्गत अनुसूचीत जातीच्या कृषीपंप धारकांच्या कृषीपंपाना उच्चदाब वितरण प्रणालीव्दारे वीज जोडणी देणे याकरिता महावितरण कंपनीस अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबत (२०१८-१९).

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्र. पुर्नविनियोजन-२०१९/प्र.क्र.२०(१)/ऊर्जा-३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :-३० मार्च, २०१९

संदर्भ :- १) शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. उविप्र-२०१८/प्र.क्र.३०/उर्जा-५ दिनांक ५.०५.२०१८
२) शासन परिपत्रक वित्त विभाग क्र. अर्थसं- २०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक ०२/०४/२०१८
३) शासन परिपत्रक वित्त विभाग क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.६९ /अर्थ-३, दि. २५.०१.२०१९
४) शासन परिपत्रक वित्त विभाग क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.४२/अर्थ-३, दि. ०८ मार्च, २०१९
५) शासन निर्णय क्र.पुर्नविनियोजन-२०१९/प्र.क.२०/ऊर्जा-३, दि. ३० मार्च, २०१९.
६) महावितरण कंपनीचे पत्र क्र.मु.म.व्य. (सांघिक वित्त)/ १४५६, दि. १४.०३.२०१९

प्रस्तावना :-

राज्यातील मार्च, २०१८ अखेर पैसे भरुन वीज जोडणीकरिता प्रलंबित असणाऱ्या कृषीपंप ग्राहकांना उच्चदाब वितरण प्रणालीव्दारे (HVDS) वीज पुरवठा करण्याच्या योजनेस संदर्भिय शासन निर्णय क्र. १ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर योजनेचा लाभ राज्यातील अनुसूचीत जाती प्रवर्गातील शेतकऱ्यांना होण्याच्या दृष्टीने सदर शेतकऱ्यांच्या कृषीपंपाचे ऊर्जीकरण करण्याकरिता सन २०१८-१९ मध्ये मागणी क्र. के-६ २८०१ वीज मुख्य लेखाशिर्ष २८०१५५५२ अंतर्गत शासनाने सुधारीत अंदाजात रु. ४७८ कोटी इतकी तरतूद मंजूर केली आहे. व फेब्रुवारी, २०१९ च्या अर्थसंकल्पिय अधिवेशनामध्ये या योजनेकरिता रु. १००० ची लाक्षणिक मागणी मंजूर करण्यात आली आहे.

२. महावितरण कंपनीने त्यांचे संदर्भिय पत्र क्र. ६ अन्वये मागणी केल्यानुसार विदर्भ व मराठवाडयातील अनुसूचीत जातीच्या कृषीपंप धारकांच्या कृषीपंपाना उच्चदाब वितरण प्रणालीव्दारे वीज जोडणी देण्याकरिता संदर्भिय शासन निर्णय क्र. ५ अन्वये रु. ३०३.१५९९ कोटीच्या पुर्नविनियोजनास शासन मान्यता देण्यात आली आहे. महावितरण कंपनीने सदर योजनेअंतर्गत विदर्भ व मराठवाडा विभागातील अनुसूचीत जातीच्या कृषीपंप धारकांच्या कृषीपंपाना उच्चदाब वितरण प्रणालीव्दारे वीज जोडणी देण्याकरिता रु. ३०३.१६ कोटीची मागणी केली आहे. त्याअनुषंगाने महावितरण कंपनीस सदर निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांना विदर्भ व मराठवाडयातील अनुसूचीत जातीच्या कृषीपंप धारकांच्या कृषीपंपाना उच्चदाब वितरण प्रणालीव्दारे वीज जोडणी देण्याकरिता रु. ३०३.१६ कोटी (रु. तीनशे तीन कोटी सोळा लाख फक्त) रोखीने वितरीत करण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे.

२. या निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेल्या अनुदानाची रक्कम ज्या कारणासाठी मंजूर करण्यात आलेली आहे त्याच कारणासाठी उपयोगात आणली जाईल याची खातरजमा महावितरण कंपनीने करावी.

३. याप्रित्यर्थ होणारा खर्च "मागणी क्र. के-०६, २८०१ वीज, ७८९ अनुसूचीत जाती उपयोजना (००)(००)(०१) उच्चदाब वितरण प्रणालीव्दारे कृषीपंपाचे ऊर्जीकरण (अजाउयो) (कार्यक्रम) ३१ सहय्यक अनुदाने (वेतन्नेतर) (२८०१५५५२) या लेखाशिर्षा खाली खर्ची टाकावा व तो सन २०१८-१९ या वर्षासाठी मंजूर झालेल्या सुधारीत अंदाजाच्या रु. ४७८ कोटी मधून भागविण्यात यावा. सदर योजना नवीन असल्याने या लेखाशिर्षाखाली निधी वितरीत करण्यासाठी सादर करण्यात आलेल्या देयकाच्या अनुषंगाने प्रमाणित करण्यात येते की या लेखाशिर्षाखाली कोणतेही संक्षिप्त देयक प्रलंबीत नाही तसेच उपयोगिता प्रमाणपत्र प्रलंबित नाही. सदर देयकाची रक्कम धरून या लेखाशिर्षाखाली रक्कम सुधारीत अंदाजाच्या मर्यादेत आहे.

४. सदर रक्कम आहरीत करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून अवर सचिव (ऊर्जा-३) व नियंत्रण अधिकारी म्हणून सह सचिव (ऊर्जा-३) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२ यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. त्यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., मुंबई यांना मंजूर झालेली रक्कम रु. ३०३.१६ कोटी (रुपये तीनशे तीन कोटी सोळा लाख फक्त) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई येथून महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनी यांच्या नांवे स्वतंत्ररित्या धनादेश काढून वितरित करण्याची कार्यवाही करावी.

५. शासन परिपत्रक वित्त विभाग, दिनांक २ एप्रिल, २०१८ मध्ये परिच्छेद ७ मधील अट क्रमांक १ ते ९ लागू होत नसल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे. तसेच परिपत्रकाच्या सोबतच्या परिशिष्टातील अट क्र. १ ची पूर्तता झाल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे. अट क्र. २ ते ७ या अटी लागू होत नाहीत. परिशिष्टातील अनु.क्र. ८ मधील ३१ सहाय्यक अनुदाने वेतन्नेतर च्या अनुषंगाने तपासणी सूचीतील अट क्र. १ ची पूर्तता होत आहे. तपासणी सूचीतील अट क्र. २ ते १० या अटी लागू होत नसल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे. तथापि, वित्त विभागाने मंजूर केलेल्या सुधारीत अंदाजाच्या मर्यादेत निधी वितरणाचे अधिकार प्रशासकीय विभागास देण्यात आले आहे. सदर अधिकारात महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनी मर्या., यांना रु. ३०३.१६ कोटी (रुपये तीनशे तीन कोटी सोळा लाख फक्त) इतकी तरतूद वितरीत करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र. ९५/-१९/व्यय-१६, दि.२८/३/२०१९ तसेच वित्त विभागाने सन २०१८-१९ साठी मंजूर केलेल्या सुधारित अंदाजाच्या मर्यादेत प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारात प्रधान सचिव (ऊर्जा) यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

७.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०१९०३३०२००६०८८२१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Nitin Gaikwad

Digitally signed by Nitin Gaikwad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industry Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5892c3fd8686c1921e784a3faa9888d155b03f5591ce11b21a1b5006247f6972, serialNumber=2276ac762af372d872c2f01d5bb5086166f4a6e20a1bdf9762d556a93f5d118e, cn=Nitin Gaikwad
Date: 2019.03.30 20:08:43 +05'30'

(नितिन गायकवाड)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, प्रकाशगड, वांद्रे, (पूर्व), मुंबई-५१
२) सचिव महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, वर्ल्ड ट्रेड सेंटर नं.१, १३ वा मजला, कफ परेड, कुलाबा, मुंबई-०५
३) मा. विरोधी पक्ष नेता, विधान परिषद / विधानसभा, विधान भवन, मुंबई
४) महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई-४०००२०.
५) महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई-४०००२०.
६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर.
७) अधिदान व लेखा अधिकारी, अराप /रालेवि-१), मुंबई.
८) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.
९) निवासी लेखा अधिकारी, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१.
१०) उप सचिव (ऊर्जा-५) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई -४०००३२.
११) कक्ष अधिकारी (रोखशाखा), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई -४०००३२.
१२) कक्ष अधिकारी वित्त विभाग, (अर्थसंकल्प-१४ / साधनसंपत्ती / साऊ / व्यय-१६) मंत्रालय, मुंबई ३२
१३) निवडनस्ती (ऊर्जा-३) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.